महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४

क्र.कोविमं/लेखा/2057
कोल्हापूर-४१६ ००४
दिनांक :- २१.१२.२०२१

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय :- कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/ दत्तक पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.**

**संदर्भ :- १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.शैसयो-२०२१/प्र.क्र.८४/एसडी-५, दि. ०३/१२/२०२१**
**२) राज्य मंडळाचे क्र.रा.मं./लेखा-६/७०५५ दि.२०/१२/२०२१ चे पत्र.**

उपरोक्त विषय व संदर्भिय शासन निर्णयानुसार कळविण्यात येते की, कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे सन-२०२२ मध्ये आयोजित करण्यात येणा-या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या नियमित विद्यार्थ्यांचे संपूर्ण परीक्षा शुल्क एक विशेष बाब म्हणून माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

१) सदर सवलत फक्त या वर्षासाठीच (सन-२०२२) परीक्षेस प्रविष्ठ होणा-या नियमित विद्यार्थ्यांसाठीच देय राहील.

२) लाभार्थी विद्यार्थ्यांचे निश्चितीकरण करण्याची जबाबदारी संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांची असून त्यासाठी त्यांनी आवश्यक मूळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे पाहून याबाबत खात्री करणे आवश्यक राहील.

३) उपरोक्त परीक्षेचे परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून जमा करुन घेतलेले नसल्यास ते शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर जमा करुन घेण्याची आवश्यकता नाही. मात्र शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचा प्रस्ताव परिशिष्ठ-अ व संबंधित साक्षांकीत केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांसह मंडळ कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

४) ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क प्राप्त करुन घेवून ते मंडळाकडे जमा केले नसल्यास शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावरुन ते लाभार्थी विद्यार्थ्यांना त्वरीत परत करण्यात यावे. मात्र, शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचा प्रस्ताव परिशिष्ठ-ब व संबंधित साक्षांकीत केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांसह मंडळ कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

५) ज्या विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क जमा करुन घेवून ते मंडळाकडे जमा केले असल्यास अशा लाभार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफीचा व शुल्क परताव्याचा प्रस्ताव शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी परिशिष्ठ-क व संबंधित साक्षांकीत केलेली कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांसह मंडळ कार्यालयाकडे मंजूरीसाठी सादर करावा.

६) कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे ज्या विद्यार्थ्यांनी आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेले असल्याबाबत संबंधित कागदपत्रावरुन खातरजमा करावी (उदा. मृत्यू प्रमाणपत्र, उपचारासंदर्भातील कागदपत्रे). संबंधित कागदपत्रांवरुन योग्य लाभार्थींचाच प्रस्ताव मंडळाकडे पाठविला जाईल याची संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्यांनी दक्षता घ्यावी.

७) सदर योजनेंतर्गत सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफीचा लाभ उपलब्ध होईल तसेच सदर लाभापासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याचीही दक्षता घ्यावी.

(सुवर्णा सावंत)
प्र. विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**सोबत** - परिशिष्ठ-अ, ब व क

D:\Sanjay\Office corres\lsm files\Letters Blank

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## ————विभागीय मंडळ, ————

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२२
कोवीड—१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबतचा प्रस्ताव

| | |
|---|---|
| १. शाळा/कमवि.चे नाव :— .................................... | ५. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे नांव :— .................................... |
| २. पत्ता :— .................................... <br> .................................... | ६. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे भ्रमणध्वनी क्रमांक :— .................................... |
| ३. ईडेक्स नंबर :— .................. .................. | ७. शाळा/कमवि.चे दुरध्वनी क्रमांक:— .................................... <br> एसटीडी कोड ............... क्रमांक ..................... |
| ४. युडायस नंबर :—.................................... | |

### परिशिष्ट — अ

(परीक्षा शुल्क विद्यार्थ्यांकडून जमा करून घेतलेले नसल्यास)
(माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा यासाठी स्वतंत्र परिशिष्ट भरावे)

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | कोवीड—१९ विषाणूच्या प्रादुर्भावापूर्वी हयात असलेले आई व वडील/पालक/ कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | विद्यार्थ्याशी नाते | कोवीड—१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गमावलेले आई व वडील/पालक/कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | पुराव्यासाठी ग्राहय धरण्यात आलेले कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांचा तपशील (संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकित करून सोबत जोडावीत) | परीक्षा शुल्क माफीची रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १. | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

स्थळ :—
जावक कगांक व दिनांक:—

स्वाक्षरी,
मुख्याध्यापक/प्राचार्य

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## ————विभागीय मंडळ, ————

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२२
कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबतचा प्रस्ताव

| | |
|---|---|
| १. शाळा/कमवि.चे नाव :– .................................................<br>२. पत्ता :– .................................................<br>.................................................<br>३. ईंडेक्स नंबर :– .................. ..........................<br>४. युडायस नंबर :–................................................. | ५. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे नांव :– .............................................<br>६. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे भ्रमणध्वनी क्रमांक :– ...........................<br>७. शाळा/कमवि.चे दुरध्वनी क्रमांक:– ...........................................<br>एसटीडी कोड ............... क्रमांक ...................... |

### परिशिष्ट — ब

(विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क प्राप्त करून घेवून ते मंडळाकडे जमा केले नसल्यास)
(माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा यासाठी स्वतंत्र परिशिष्ट भरावे)

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावापूर्वी हयात असलेले आई व वडील/पालक/ कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | विद्यार्थ्याशी नाते | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गमावलेले आई व वडील/पालक/कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | पुराव्यासाठी ग्राहय धरण्यात आलेले कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांचा तपशील (संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकित करून सोबत जोडावीत) | परीक्षा शुल्क माफीची रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

स्थळ :–
जावक क्रमांक व दिनांक:–

स्वाक्षरी,
मुख्याध्यापक/प्राचार्य

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

### ————विभागीय मंडळ, ————

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा/उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा सन २०२२
कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे आई व वडील, हयात पालक अथवा कायदेशीर पालक/दत्तक पालक गमावलेल्या
विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करणेबाबतचा प्रस्ताव

| | |
|---|---|
| १. शाळा/कमवि.चे नाव :– ..........................................<br>२. पत्ता :– ..........................................<br>..........................................<br>३. ईंडेक्स नंबर :– .................... ..........................<br>४. युडायस नंबर :–..........................................<br>५. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे नाव :– ..........................................<br>६. मुख्याध्यापक/प्राचार्य यांचे भ्रमणध्वनी क्रमांक :– .............................. | ७. शाळा/कमवि.चे दुरध्वनी क्रमांक:– ..........................................<br>एसटीडी कोड ................ क्रमांक ......................<br>८.परीक्षा शुल्क परताव्यासाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाच्या पगार खात्याव्यतिरिक्त मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्या पदनामाने असलेल्या अन्य बॅंक खात्याचा तपशील:–<br>१. बॅंकेचे नाव:– ..................................शाखेचे नाव:–...............<br>२. खाते क्रमांक:–..........................................<br>३. आयएफएससी कोड:– .............................. |

### परिशिष्ट – क

**(विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क जमा करून ते मंडळाकडे जमा केले असल्यास)**

**(माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा यासाठी स्वतंत्र परिशिष्ट भरावे)**

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे नाव | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावापूर्वी हयात असलेले आई व वडील/पालक/ कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | विद्यार्थ्याशी नाते | कोवीड–१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे गमावलेले आई व वडील/पालक/कायदेशीर पालक/दत्तक पालक यांचे नाव | पुराव्यासाठी ग्राह्य धरण्यात आलेले कागदपत्रे/प्रमाणपत्रे यांचा तपशील (संबंधित कागदपत्रे/प्रमाणपत्रे साक्षांकित करून सोबत जोडावीत) | परीक्षा शुल्क माफीची रक्कम रूपये | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |

स्थळ :–
जावक क्रमांक व दिनांक:–

स्वाक्षरी,
मुख्याध्यापक/प्राचार्य